**<u>आदेश निशाणी क्र.१२</u>**
(दिनांक २३/०७/२०२५)

प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश १ नियम १० अन्वये त्यांना दाव्यात समाविष्ट करण्याकरीता दाखल केला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन खालील प्रमाणेः-**

२. वादीने सदरचा दावा सावंतवाडी तालुक्यातील ग्रामपंचायत मळेवाड मधील म्हापसेकरवाडी या प्रभागाचे म्हापसेकरवाडी व मुळीकवाडी असे दोन स्वतंत्र प्रभाग करुन त्या प्रभागाच्या रेकॉर्डला म्हणजेच ग्रामपंचायत नमुना नं. ८ ला स्वतंत्र शासकीय रेकॉर्ड करण्याची प्रतिवादी क्र. १ व २ यांना आज्ञार्थी ताकीद होण्यासाठी दाखल केला आहे. सदर प्रकरणाबाबत अर्जदार यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज गुणदोषांवर चालवून मा. उच्च न्यायालयाने सदर बाबत महाराष्ट्र शासनाने राजपत्र काढल्यास अर्जदार याने योग्य त्या कार्यालयात दाद मागावी असा आदेश केलेला आहे. अर्जदार हे मौजे मळेवाड, म्हापसेकरवाडी येथील कायमचे रहिवाशी असून कामाधंद्यानिमित्त मुंबई येथे रहातात. दाव्याच्या विषयामध्ये अर्जदार यांचा हितसंबंध आहे. म्हापसेकरवाडी येथे त्यांची घर व जमिन मिळकत आहे. अर्जदार सदर दाव्यात प्रतिवादी क्र. ३ म्हणून सामील झाल्यास दाव्याचा योग्य तो निकाल होण्याकरीता आवश्यक पक्षकार आहेत. सबब अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती अर्जदारतर्फे करण्यात आली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश करावा असे कथन केले आहे.

४. वादी यांनी सदर अर्जावर नि. १६ कडे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आह. वादीचे म्हणणे की, अर्जदार यांचा दाव्याशी कोणताही हितसंबंध नाही.

दाव्यातील विषय तसेच दाव्यास घडलेले कारण हे अर्जदार यांच्या तथाकथित कोणत्याही हक्कांशी संलग्नीत नाही. अर्जदार यांचा अर्ज मंजुर केल्यास दाव्यातील गुंतागुंत वाढणारी आहे. दाव्यास कारण हे प्रतिवादींमुळे घडलेले आहे. वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान असलेल्या वादा संदर्भात वादींनी दाद मागितलेली आहे. अर्जदार यांना प्रस्तुत दाव्याकामी पक्षकार म्हणून सामील करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. सबब अर्ज नामंजुर करावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार, वादी तसेच प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला.

६. वादीने प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याविरुध्द आज्ञार्थी ताकीद मिळण्याकरीता प्रस्तुत दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात म्हापसेकरवाडी व मुळीकवाडी अशा दोन स्वतंत्र वाड्या/प्रभाग पूर्ववत करुन त्याची नोंद ग्रामपंचायत नमुना नं. ८ ला तसेच मुळीक वाडीतील ग्रामस्थांच्या सर्व शासकीय कागदपत्रांवर होण्याकरीता जरुरी ती कार्यवाही करण्याकरीता प्रतिवादी क्र.१ व २ यांना आज्ञार्थी ताकीद देण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत अर्जदाराच्या कथनानुसार सदर प्रकरणाबाबत त्यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात याचिका अर्ज नंबर ४१६१/२०१७ दाखल केली होती. त्यावर योग्य त्या कार्यालयात दाद मागावी असा आदेश पारीत करण्यात आला होता. सदर बाब वादीने दाव्यात देखील नमुद केलेली आहे. प्रस्तुत दाव्यातील वाद हा वाडी व प्रभागाच्या नामकरणाविषयी आहे. अर्जदार हा वादीच्या गांवचाच ग्रामस्थ आहे. त्याने या विषया संदर्भात प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरुध्द याचिका दाखल केली होती. त्यामुळे सदर दाव्यात अर्जदार याला पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे. जेणेकरुन भविष्यात उद्भवणारी गुंतागुंत टाळता येईल व दावा गुण दोषावर चालविण्यास मदत होणार आहे. तसेच, भविष्यात उद्भवणारी गुंतागुंत टाळता येईल व दावा गुणदोषांवर चालविण्यास मदत होईल. सबब, खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जदार यांस प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. ३ म्हणून समाविष्ट करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2025.07.23 17:08:05 +0530

दिनांक २३/०७/२०२५

(जा.म.मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
सावंतवाडी